## कामाचा अहवाल सादर : २२० मीटर बोगद्याचे काम पूर्ण; १,५०० प्रकल्पबाधितांचे स्थलांतर

# ‘मेट्रो-३’ कामाची गाडी सुसाट!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्या भुयारी मेट्रो-३ च्या कामाला १८ महिने पूर्ण होत आहेत. या १८ महिन्यांत मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनवर विविध कारणांमुळे सातत्याने टीका झाली. असे असले, तरी १८ महिन्यांत बरेचसे काम पूर्ण केल्याचा दावा कार्पोरेशनने केला आहे. मेट्रो-३च्या कामाची गाडी सुसाट धावत असून, या १८ महिन्यांच्या कामाचा त्यांनी नुकताच आढावा घेतला.

**लोकमत बायोस्कोप**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिलेल्या माहितीनुसार, सद्यस्थितीमध्ये २२० मीटर्स बोगद्याचे काम पूर्ण झाले असून, ५.६५ किलोमीटरच्या बोगद्याला सिमेंटचे अस्तर करण्यात आले आहे. ७४ पाईल बोरिंग मशिन, २९ डीटीएच मशिन, ७३ एक्झिव्हेटर्स, ५०० ते ७०० टन क्षमतेच्या ३२ मोबाइल क्रेनसारख्या अवाढव्य यंत्रांचा वापर करण्यात आला आहे. विशेषत: एकूण ७ टनेल बोरिंग मशिन्स साइट्सवर दाखल झाल्या आहेत. यातील पाच मशिन्स कार्यान्वित असून, आणखी एक मशिन एका महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित होणार आहे. एकूण १ हजार ५०० प्रकल्पबाधितांना स्थलांतरित करण्यात आले आहे. सातही पॅकेजमधील कास्टिंग यार्ड कार्यान्वित आहेत. ४ लाख २६ हजार क्युबिक मीटर राडारोडा काढण्यात आला आहे.



### असा आहे मेट्रो ३ प्रकल्प

प्रकल्पाची किंमत
23,136 Crore

27 एकूण स्थानके
भुयारी स्थानके 26 | जमिनीवर स्थानक 1

किलोमीटर लांबी 33.5 Km

30 शहरातील प्रमुख शैक्षणिक संस्था | 30 मनोरंजन स्थळे | 6 व्यापारी केंद्रे आणि | आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानतळ यांना जोडणार

2031 या वर्षापासून १७ लाख प्रवाशांना मेट्रो-३ मधून प्रवास करणे शक्य | 15% पर्यंत उपनगरीय रेल्वेवरील भार मेट्रो ३ मुळे कमी होणार | 50% वेळ वाचवणे शक्य

मेट्रो-३ मुळे कफपरेड ते विमानतळ हे अंतर पार करण्यासाठी निम्मा वेळ कमी लागणार

### प्रवास सुखकर होणार

“मुंबईकरांचा संयम आणि पाठिंब्यामुळे मेट्रो-३ चे काम करणे शक्य होत आहे. नागरिकांनी केलेल्या सहकार्यामुळेच आम्हाला आजवरचे यश मिळाले आहे. सरकारी विभागांनीही याकामी मोलाची मदत केली आहे. प्रकल्पाकडे सकारात्मकतेने पाहिल्यामुळे यश संपादन होत असून, निश्चितच मेट्रो-३ मुळे भविष्यात मुंबईकरांचा प्रवास सुखकर होणार आहे.

- अश्विनी भिडे,
व्यवस्थापकीय संचालक,
मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

- आरे ते वांद्रे-कुर्ला संकुलापर्यंतच्या प्रकल्पातील पहिला टप्पा सप्टेंबर २०२०पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- वांद्रे-कुर्ला संकुल ते कफ परेडपर्यंतचा प्रकल्पातील दुसरा टप्पा मार्च २०२१पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

### पर्यावरपूरक प्रकल्प

- प्रकल्पामुळे दहा हजार मेट्रिक टन इतके कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी होईल.
- ५.५४ लाख वाहनांच्या फेऱ्या कमी होतील. परिणामी, २.९५ लाख लीटर इंधनाची दररोज बचत होईल.

### कर्मचारी संख्या

- मनुष्यबळाचा विचार करता, ७ हजार ६०० कर्मचारी प्रकल्पासाठी कार्यरत आहेत.
- यामध्ये कुशल-अकुशल कामगार, अभियंते, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदारांचा समावेश आहे.